आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. ६८व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरच्या दीक्षाभूमीवर लाखों अनुयायांनी केले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला अभिवादन, मुख्य सोहळयाला काही वेळात होणार प्रारंभ.
2. देशात महिलांवर होत असलेल्या अत्याचारांबद्दल सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्याकडून चिंता व्यक्त; नागपूरमध्ये संघाच्या विजयादशमी सोहळ्याला केल संबोधित.
3. अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके पक्ष विरोधी कारवायांसाठी काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित.
4. बोट सफारीने 'ॲक्वाफेस्ट नागपूर' चे उद्घाटन, आज पासून १४ ऑक्टोबर पर्यंत आयोजन.

धम्मचक्र प्रवर्तन दिन

६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज देशभरासह राज्यात साजरा होत आहे. १९५६ साली विजयादशमीच्या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूर इथल्या दीक्षाभुमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्या दिवसाचं स्मरण म्हणून धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. नागपूर इथं आज भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सामुहिक बुद्धवंदना झाली. यावेळी समता सैनिक दलाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देऊन अभिवादन केलं. संध्याकाळी 6 वाजता दीक्षाभुमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी देशभरातून बौद्धअनुयायी नागपुरात दाखल झाले आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून अनुयायांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. दीक्षाभूमीवर पुस्तक बुद्धमूर्ती तसेच विविध सामाजिक संघटनांच्या शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारे स्टॉल लागले आहेत. देशभरातील कानाकोपऱ्यातून येणाऱ्या अनुयायांच्या स्वागतासाठी प्रशासनासह स्वयंसेवी संस्था सज्ज आहे.ठिकठिकाणी विविध स्टॉल, भोजनदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रात्रीच्या निवाऱ्याची सोय प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी केली आहे. काही अनुयायांनी दीक्षाभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

*माणसाला माणसासारखं जगाच्या सुद्धा अधिकार नव्हता परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या 56 च्या धम्मक्रांतीनंतर या दीक्षाभूमीवरती सर्व बौद्ध धम्म बांधवांना दलित बांधवांना या ठिकाणी माणसासारखा जगण्याचा अधिकार मिळाला आणि ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची पुण्याई आहे, म्हणून आजच्या दिनी जगभरातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पाईक आहेत हे बाबासाहेबांना नमन करायला नतमस्तक व्हायला या दीक्षाभूमी वरती येतात आणि या धम्मक्रांती जागेला पावन दीक्षाभूमीला नमन करतात.*

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या संध्याकाळी होत असलेल्या सोहळयाला मुख्य अतिथी म्हणून उत्तरप्रदेशच्या कुशीनगर इथले भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी.ज्ञानेश्वर आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा उपस्थितीत राहणार असून, या समारोहाचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई राहणार आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा दीक्षाभूमी सोबतच कामठी येथील ड्रॅगन पॅलेस काटोल रोडच्या चिचोली येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय शांतीवन येथे देखील साजरा केला जात आहे दरम्यान ड्रॅगन पॅलेस येथील कार्यक्रमांमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माजी मंत्री एडवोकेट सुलेखाताई कुंभारे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितलं की__

*भगवान गौतम बुद्धांनी जो आपल्याला धम्म दिला त्या धम्माच्या मार्गावर चालूनच आपण जगाचं कल्याण करू शकतो आणि म्हणूनच त्या मार्गाने चालण्याचा संकल्प घेण्याचा आजचा दिवस आहे तो संकल्प आपण सर्व मिळून घेऊया.*

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने आज सकाळी दहा वाजता वाशीम इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बौद्ध बांधवांनी बौद्ध वंदना केली 22 प्रतिज्ञांचे वाचन केले. यंदा चंद्रपूरच्या दीक्षाभुमी सोहळयाकरीता नागरिकांचा प्रवेश हा चांदा क्लब मार्गे असणार आहे.सोहळयाप्रसंगी होणाऱ्या गर्दीचे योग्य नियोजन करण्यास व कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने प्रशासनातर्फे हा निर्णय घेण्यात आला असुन स्टॉल्स धारकांनी त्यांचे स्टॉल्स हे चांदा क्लब ग्राऊंडच्या आतच लावण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ –विजयादशमी

देशात महिलांवरच्या अत्याचारांबद्दल सरसंघचालक मोहन भागवत यांनी चिंता व्यक्त केली आहे. कोलकत्ता इथल्या रुग्णालयात घडलेली घृणास्पद घटना म्हणजे गुन्हेगारी आणि राजकारण यांच्यातल्या परस्पर संबधांचा दुष्परिणाम आहे, असं ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या ९९ व्या स्थापना दिनानिमित्त आज सकाळी नागपूर इथं आयोजित विजयादशमीच्या मुख्य कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. यावेळी त्यांनी ओटीटी प्लॅटफॉर्मवर पसरलेल्या अभ्रदतेविषयी भाष्य केले.

*जिस प्रकार की बातें आती है ओटीटी प्लेटफॉर्मस वगरे पर, बताना भी अभद्रता होगी इतना बिभत्स होता है । और इसलिए मैंने कहा इसका कानून से भी नियंत्रण होने की आवश्यकता है, बहुत आवश्यकता है यह संस्कार भ्रष्टता का एक बड़ा कारण भी है ।*

शैक्षणिक संस्थांमधून सांस्कृतिक मूल्ये रुजवण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. शेजारील बांगलादेशातील अलीकडच्या परिस्थितीवर भाष्य करताना डॉ.भागवत म्हणाले की, बांगलादेश मधील कट्टरपंथी विचारसरणीमुळे केवळ हिंदूच नाही तर बांगलादेशात राहणाऱ्या अल्पसंख्याकांमध्येही असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. डॉ.भागवत यांनी राज्यघटनेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, संविधानाची प्रास्ताविका, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि अधिकारांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे आणि संविधानातील या चार महत्त्वाच्या गोष्टींचे लोकांमध्ये प्रबोधन व्हावे, अशी व्यवस्था असावी. या समारंभाचे मुख्य अतिथी इस्रो अर्थात भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष के.राधाकृष्णन यांनी 'तंत्रज्ञानानं शैक्षणिक संस्थांमध्ये बदल घडवून आणला आहे. नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल', असा विश्वास व्यक्त केला. रेशीमबाग मैदानावर देशभरातून आलेल्या स्वयंसेवकांच्या पथसंचालनानं या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी मोहन भागवत यांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह अन्य मान्यवर तसंच संघस्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते. 1925 मध्ये विजयादशमीच्या पावन प्रसंगी डॉ.केशव हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पुढच्या वर्षी 100 वर्षे पूर्ण होणार आहेत.

## विजयादशमी राष्ट्रीय

विजयादशमीचा सण हा अन्यायावर न्यायाचा विजय मिळवणारा तसंच सत्य आणि सदाचार या मूल्यावर विश्वास वाढवणारा सण आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशातल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. या दिवशी सर्व नागरिकांनी दुष्कृत्यांचा नाश करण्याची प्रतिज्ञा घ्यावी, असं आवाहन करत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासियांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. माँ-दुर्गा देवी आणि श्रीरामांच्या आशीर्वादानं नागरिक प्रत्येक क्षेत्रात विजय आणि यश मिळतील, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला समाज माध्यमांद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत.सीमारेषा ओलांडून विकासाचं आणि प्रगतीचं सोनं वाटायला शिकवणाऱ्या या सणाच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्या दिल्या आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केलं आहे.

## प्रधानमंत्री आंतरवासिता योजना

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेच्या पोर्टलवर आतापर्यंत १९३ कंपन्यांनी ९१ हजार इंटर्नशिप म्हणजेच आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. हे पोर्टल आजपासून अर्जदारांसाठी खुलं झालं असून अर्जदार २५ ऑक्टोबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात. कंपन्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आंतरवासिता संधीबाबत या पोर्टलवर माहिती देणार असून यामध्ये तेल, वायू, उर्जा, पर्यटन यासारख्या विविध २४ क्षेत्रांचा समावेश आहे.

## नागपूर ॲक्वा फेस्ट

समुद्रात वॉटर स्पोर्टला भरपूर संधी असतात पण छोट्या तलावामध्ये देखील जलक्रीडांचा आनंद घेता येऊ शकतो हे या ॲक्वाफेस्टमुळे सिद्ध झाले आहे. नागपूर शहरात अनेक तलाव असून तेथे वर्षभर अशा जलक्रीडा सुरू राहाव्या. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि लोकांना जलपर्यटनाचा आनंद घेता येईल, असा विश्वास विधानपरिषद आमदार परिणय फुके यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यावतीने जलपर्यटन महोत्सव 'ॲक्वाफेस्ट नागपुर' चे 12 ते 14 ऑक्टोबर 2024 दरम्यान आयोजन करण्यात आले असून त्याचे फुटाळा तलाव, वायुसेना नगर येथे शनिवारी आमदार परिणय फुके यांचे हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी यांची उपस्थिती होती. सुरुवातीला मान्यवरांनी चित्रकला व छायाचित्रण प्रदर्शनीचे फित कापून उद्धाटन केले. त्यानंतर सर्वांनी बोट सफरीचा आनंद घेतला. हा ॲक्वाफेस्ट तीन दिवसांचा असून

नागरिकांनी सकाळी 9 ते 1 आणि दुपारी 3 ते 6 या वेळात नाममात्र शुल्कात बोट सफारी, जेट स्की राईड्स, सेलिंग बोट, कयार्किंग, फ्लाइंग फिश राईड, बनाना राईड, बंपर राईड, वॉटर झोर्बिंग, इलेक्ट्रिक शिकारा, स्कूबा डायविंग चा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आलं आहे.

<u>सुलभा खोडेके</u>

अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठीनिलंबित करण्यात आलं आहे. पक्ष विरोधी कारवाया केल्याने प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्यानिर्देशावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ही कारवाई केली आहे. तसं पत्रक जरी करण्यातआलं आहे.

******